# प्रेसनोट

जा.क्र.पोउपआ/वाहतूक/पुणे शहर/ १०२५७/२०१८ पुणे, दिनांक- ३/१०/२०१८

**विषय :- नागरीकांनी सतर्क पुणेकर ॲपचा वापर करणेबाबत....**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमित प्रयत्न करण्यात येत आहे. वाहतुक शाखेकडुन नागरीकांसाठी **सतर्क पुणेकर ॲप** ही सुविधा उपलब्ध करुन दिली असून नागरीकांनी या ॲपचा वापर करावा. फेसबुक, ट्विटर किंवा व्हॉट्सॲप वर नागरीकांनी फोटो टाकल्यास कारवाई करताना ते ठिकाण, वेळ, दिनांक समजुन येत नाही त्यामुळे कारवाई करण्यास पोलीसांना अडचण निर्माण होते.

तरी, नागरीकांना याद्वारे अवाहन केले जाते की आपण **सतर्क पुणेकर ॲप**मध्ये पाठविलेल्या फोटोची वेळ व ठिकाण समजुन येत असल्याने वाहतुकीचे नियम तोडणा-या व्यक्तीवर कारवाई करणे सुलभ होते तरी **सतर्क पुणेकर ॲपचा** जास्तीत जास्त वापर करुन वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.